cmyk

# शिव वाणी

SHIV VANI

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी


का.संपादक : वेदांत वैभव स्वामी | संपादक : वैभव विवेक स्वामी

● beedshivvani@gmail.com
● vaibhav11swami@gmail.com
● Mo.9422748792/ 9822628521
● SB / BEED / RNP / 279 / 2026 - 2028

| बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २४ वे | अंक-२८ | सोमवार, दि.१३ जुलै २०२६ | RNI-MAHMAR2003/14666 | किंमतः ३ रु. | पाने : ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-24 | Issue -28 | Monday, Dt. 13 july 2026 | RNI-MAHMAR2003/14666 | Rupees - 3 Rs | PAGES - 4 |



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## केंद्र सरकारचे मोठे निर्णय....



### संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलैपासून

नवी दिल्ली : केंद्र सरकारने संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलै ते १३ ऑगस्टदरम्यान घेण्याचा निर्णय घेतला आहे. अधिवेशनात अर्थव्यवस्था, कृषी, राष्ट्रीय सुरक्षा, जनहिताशी संबंधित विधेयके आणि विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे. विरोधकांकडून महागाई व बेरोजगारीचे मुद्दे उपस्थित होण्याची शक्यता आहे.




### कोळसा गॅसिफिकेशन प्रकल्पांसाठी प्रस्ताव मागविले

नवी दिल्ली : कोळसा मंत्रालयाने कोळसा व लिग्नाइट गॅसिफिकेशन प्रकल्पांना चालना देण्यासाठी प्रस्ताव मागविले आहेत. या निर्णयामुळे देशांतर्गत कोळशाचा अधिक कार्यक्षम वापर, इंधन आयात कमी करणे, उद्योगांना प्रोत्साहन आणि रोजगारनिर्मितीला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



### डिजिटल शासकीय सेवांच्या विस्तारावर भर

नवी दिल्ली : केंद्र सरकारने सर्व मंत्रालयांना नागरिकांना अधिकाधिक सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या आहेत. डिजिटल प्रशासनामुळे सेवा जलद, पारदर्शक आणि सुलभ होणार असून कागदपत्रांची प्रक्रिया कमी करून नागरिकांचा वेळ आणि खर्च वाचविण्यावर भर देण्यात आला आहे.



### पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती

नवी दिल्ली : केंद्र सरकारने सुरू असलेल्या राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे, बंदरे आणि इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेऊन त्यांची कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे आर्थिक विकास, गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.



### 'विकसित भारत २०४७' अभियानाला वेग

नवी दिल्ली : विकसित भारत २०४७ या संकल्पनेनुसार सर्व मंत्रालयांनी विकासकामांना गती देण्याचे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत. रोजगार, उद्योग, तंत्रज्ञान, शिक्षण आणि पायाभूत सुविधा यांवर विशेष भर देत देशाला विकसित राष्ट्र बनविण्याच्या उद्दिष्टासाठी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### ऊर्जा सुरक्षेसाठी केंद्राचा भर

नवी दिल्ली : देशाची ऊर्जा सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी केंद्र सरकारने कच्चे तेल, नैसर्गिक वायू आणि पर्यायी इंधनाच्या उपलब्धतेवर भर देण्याचा निर्णय घेतला आहे. ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणूक वाढवून आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

# भेसळीने महाराष्ट्र पुन्हा हादरला..!

## ५ रुपयांत तयार 'विषारी दूध' ७० रुपयांत विक्री; २ हजार कोटींच्या रॅकेटचा पर्दाफाश..!

**पुणे | विशेष प्रतिनिधी**

**राज्यातील अन्नसुरक्षा व्यवस्थेलाच हादरा देणाऱ्या देशातील सर्वात मोठ्या सिंथेटिक दूध भेसळ रॅकेटचा अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आणि पुणे ग्रामीण पोलिसांनी संयुक्त कारवाईत पर्दाफाश केला आहे. अवघ्या ५ रुपयांच्या रासायनिक मिश्रणातून तयार होणारे बनावट दूध तब्बल ७० रुपये प्रतिलिटर दराने नैसर्गिक दूध म्हणून विकले जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या रॅकेटची वार्षिक उलाढाल सुमारे २ हजार कोटी रुपये असल्याचा प्राथमिक अंदाज असून, या कारवाईमुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे.**

एफडीए आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल यांच्या नेतृत्वाखाली ४ व ५ जुलै रोजी मंचर परिसरात धाड टाकण्यात आली. तपासात दुधातील प्रोटीन, फॅट आणि एसएनएफचे प्रमाण कृत्रिमरीत्या वाढवण्यासाठी वे पावडर, स्कीम्ड मिल्क पावडर, खाद्यतेल, डिटर्जंट, शाम्पू आणि इमल्सिफायर यांचा वापर होत असल्याचे उघड झाले. प्रयोगशाळेतील प्राथमिक चाचण्यांनाही











### ठळक वैशिष्ट्ये...

* देशातील सर्वात मोठे सिंथेटिक दूध भेसळ रॅकेट उघड
* अवघ्या ५ रुपयात बनावट दूध तयार ते ७० रुपये प्रतिलिटर विक्री
* वार्षिक अंदाजे उलाढाल तब्बल २,००० कोटी
* १,३८५ किलो रसायने आणि २,७६७ किलो बनावट दूध जप्त
* डिटर्जंट, शाम्पू, खाद्यतेल, वे पावडर, इचझ चा वापर
* राज्यातील ६ ते ७ जिल्ह्यांत रॅकेटचे जाळे
* २६ आरोपींवर इछड आणि अन्न सुरक्षा कायद्यानुसार गुन्हे
* एफडीए व पुणे ग्रामीण पोलिसांची संयुक्त धडक कारवाई

### राज्यातील ६ ते ७ जिल्ह्यांत जाळे, २६ जणांवर गुन्हा



चकवा देण्यासाठी ही भेसळ केली जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. कारवाईत मंचर येथील नवकार डिस्ट्रीब्यूटर्स ◀◀ पान २ वर

### 'विषारी दुधाचा फॉर्म्युला'

प्रोटीन वाढवण्यासाठी : वे पावडर (Whey Powder), SNF वाढवण्यासाठी : स्कीम्ड मिल्क पावडर (SMP), फॅट वाढवण्यासाठी : पाम/खाद्यतेल आणि मिश्रण एकजीव करण्यासाठी : डिटर्जंट, शाम्पू आणि लिक्विड इमल्सिफायर यांचा बेकायदेशीर वापर हा प्रयोगशाळेतील चाचण्यांमध्ये दूध नैसर्गिक असल्याचा भास निर्माण करण्यासाठी सर्रास केला जात होता.

### तपासाची दिशा..

विषारी दूध कोणत्या डेअऱ्या किंवा दूध संघांना पुरवले गेले.. ?आरोपींच्या बँक खाते, यूपीआय, जीएसटी आणि मोबाईल कॉलची तपासणी.,जप्त नमुन्यांचे शासकीय प्रयोगशाळेत रासायनिक विश्लेषण, संपूर्ण वितरण साखळीचा शोध घेतला जात आहे.

### केवळ गुन्हे दाखल करून नव्हे तर अशा टोळ्यांचे...

दुधासारख्या जीवनावश्यक अन्नपदार्थात विष मिसळून नफ्याचा काळाबाजार करणाऱ्यांवर केवळ गुन्हे दाखल करून चालणार नाही, तर अशा टोळ्यांचे आर्थिक जाळे उद्ध्वस्त करून त्यांना कठोर शिक्षा होणे हीच जनतेच्या आरोग्याची खरी हमी ठरेल.

## समाजकल्याण विभागाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**कोल्हापूर | प्रतिनिधी**

समाजकल्याण विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. पात्र लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घेऊन आर्थिक व सामाजिक प्रगती साधावी, असे आवाहन समाजकल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे यांनी केले आहे. समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांमध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील नवउद्योजकांसाठी मार्जिन मनी योजना, स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवठा योजना, गटई कामगारांना ◀◀ पान २ वर

## वडवणीच्या विकासकामांना गती द्या; हयगय करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा

### 'संपूर्णता अभियान २.०'चा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला आढावा

**बीड | प्रतिनिधी**

आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत वडवणी तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या 'संपूर्णता अभियान २.०' चा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शुक्रवारी सविस्तर आढावा घेतला. विकासकामांमध्ये कोणतीही दिरंगाई, निष्काळजीपणा किंवा



हयगय सहन केली जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिला. वडवणी ◀◀ पान २ वर

## वारीत प्रथमच एअर ॲम्बुलन्सची सुविधा

### अत्यावश्यक रुग्णांना तातडीची मदत-आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

**धुळे | प्रतिनिधी**

आषाढी वारीदरम्यान लाखो वारकरी भाविकांच्या आरोग्य सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत राज्य शासनाने यंदा प्रथमच अत्यावश्यक रुग्णांसाठी एअर ॲम्बुलन्सची सुविधा उपलब्ध करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ही माहिती राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पालखी मार्गावरील आणि मुक्कामस्थळांवरील आरोग्य सुविधांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. ◀◀ पान २ वर

## सर्वांगीण विकासासाठी दर्जेदार कामांना प्राधान्य-पालकमंत्री गुलाबराव पाटील

### जळगावने सलग चौथ्या वर्षी १०० टक्के निधी खर्चाचा विक्रम कायम

**जळगाव | प्रतिनिधी**

जळगाव जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी दर्जेदार नियोजन आणि वेळेत कामांच्या अंमलबजावणीला सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे, असे निर्देश राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. जिल्ह्याने सलग चौथ्या वर्षी जिल्हा वार्षिक योजनेतील १०० टक्के निधी खर्च करून राज्यात आदर्श निर्माण केला असून, ही कामगिरी प्रभावी नियोजन,



सक्षम अंमलबजावणी आणि लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्या समन्वयाचे फलित असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ते मुंबई मंत्रालयातून ◀◀ पान २ वर

## संभाव्य पूरस्थितीला सामोरे जाण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज;मुख्यमंत्र्यांना दिला तयारीचा आढावा

**कोल्हापूर | प्रतिनिधी**

संभाव्य पूरस्थितीला प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने सर्व आवश्यक तयारी पूर्ण केली असून, सर्व संबंधित यंत्रणा सतर्क व सज्ज असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दूरदृश्य प्रणालीद्वारे झालेल्या आढावा बैठकीत दिली.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी मुंबई येथून राज्यातील पूरप्रवण व पूरबाधित जिल्ह्यांच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. राठोड यांनी जिल्ह्यातील सध्याचे पर्जन्यमान, पंचगंगा नदीच्या वाढत्या पाणीपातळीची स्थिती, बचाव व मदतकार्याची तयारी, नागरिकांच्या सुरक्षित स्थलांतराचे नियोजन तसेच विविध विभागांनी केलेल्या ◀◀ पान २ वर

## 'ज्ञानराधा'च्या ३९ हजार ठेवीदारांना दिलासाची आशा.!

# ठेवी विनाविलंब परत द्या, प्रक्रियेला तातडीने गती द्या-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### जप्त मालमत्तेचे पुनर्मूल्यांकन करून लिलाव प्रक्रिया वेगवान करण्याचे आदेश




**बीड | प्रतिनिधी**

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीमध्ये आयुष्यभराची बचत अडकलेल्या हजारो ठेवीदारांसाठी दिलासादायक घडामोड घडली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी या प्रकरणाचा विशेष आढावा घेत ठेवीदारांचे पैसे विनाविलंब आणि पारदर्शक पद्धतीने परत मिळण्यासाठी आवश्यक ती सर्व प्रक्रिया तातडीने राबविण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. न्यायालयाकडे आवश्यक अधिसूचना काढण्याची प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे आदेशही त्यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी संपूर्ण प्रकरणाचा सविस्तर आढावा ◀◀ पान २ वर

### ● ठळक मुद्दे...

३९,०७६ ठेवीदारांचे पैसे अडकले आहेत., २५० स्थावर, ७४ जंगम मालमत्ता आणि ४० बँक खाती जप्त., प्रारंभिक मूल्यांकन १७२.०३ कोटी, तर पोलिस विभागाने जप्त मालमत्तेचे मूल्य ३९९.०३ कोटी इतके नमूद केले., व्यावसायिक मूल्यांकन झाल्यास मालमत्तेची किंमत सुमारे चारपट वाढू शकते, असा प्रशासनाचा अंदाज., लिलाव प्रक्रिया जलद करण्यासाठी बीडमध्ये स्वतंत्र न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव उच्च न्यायालयाकडे सादर.

### ठेवीदारांचा पैसा कंपन्यांमध्ये वळवल्याचा आरोप..?

बैठकीत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले की, ज्ञानराधा मल्टीस्टेटमधील ठेवीदारांच्या पैशाचा वापर करून सुरेश कुटे व त्यांच्या निकटवर्तीयांना नियमबाह्य आणि विनातारण कर्जवाटप करण्यात आले. त्यानंतर हा निधी कुटे समूहाच्या विविध कंपन्यांमध्ये वळविण्यात आला. संबंधित कंपन्यांनी या मालमत्ता विविध बँकांकडे तारण ठेवून मोठ्या प्रमाणात कर्ज उचलले. कर्ज थकीत झाल्यानंतर बँकांनी एनसीएलटीकडे दावे दाखल केले आहेत.

### 'ठेवीदारांना न्याय मिळालाच पाहिजे'..!

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, ठेवीदारांच्या आयुष्यभराच्या कष्टाची बचत परत मिळणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. त्यामुळे कायदेशीर प्रक्रिया जलद, पारदर्शक आणि परिणामकारक पद्धतीने पूर्ण करून ठेवीदारांना शक्य तितक्या लवकर दिलासा देण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे.

### थोडक्यात पण महत्वाचे...

### ज्ञानराधा प्रकरण एका नजरेत..

ठेवीदार : ३९,०७६ , जप्त स्थावर मालमत्ता : २५०, जंगम मालमत्ता : ७४, जप्त बँक खाती : ४०, प्रारंभिक मूल्यांकन : १७२.०३ कोटी, पोलिस विभागानुसार मूल्य : ३९९.०३ कोटी, स्वतंत्र न्यायालयाचा प्रस्ताव उच्च न्यायालयाकडे, पुनर्मूल्यांकनानंतर किंमत वाढण्याची शक्यता : सुमारे ४ पट

cmyk

## अग्रलेख....

# मराठवाडा तहानलेला... सरकार अजूनही शांत.?

### अन्यथा.. करपणाऱ्या पिकांसोबत त्यांच्या आशाही करपतील..!

बीड – पावसाळा सुरू होऊन महिना उलटला, पण मराठवाड्याच्या शिवारात अजूनही दमदार पावसाचा मागमूस नाही. पहिल्या हलक्या पावसावर विश्वास ठेवत शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यांसारख्या खरीप पिकांची पेरणी केली. आता मात्र जमिनीतील ओल संपत चालली आहे. अनेक ठिकाणी उगवलेली पिके करपू लागली असून शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे.

दुबार पेरणी म्हणजे केवळ पुन्हा बियाणे टाकणे नव्हे तर ती शेतकऱ्याच्या आर्थिक कंबरड्यावर दुसरा घाव असतो. महागडी बियाणे, खते, मशागत, मजुरी यासाठी आधीच कर्ज काढलेला शेतकरी पुन्हा खर्च कसा करणार ? बँकांचे हप्ते, सावकारांचे व्याज आणि घरखर्च यांचा ताळमेळ बसविताना त्याची अवस्था अधिक बिकट होणार आहे.

आज मराठवाड्यातील शेतकरी पावसाच्या प्रत्येक ढगाकडे आशेने पाहत आहे. हवामान विभागाचा अंदाज महत्त्वाचा असला, तरी शेतकऱ्याला अंदाज नव्हे तर प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. जर या आठवड्यातही समाधानकारक पाऊस झाला नाही, तर अनेक भागांत दुबार पेरणी अटळ ठरेल. ही परिस्थिती ओळखून सरकारने आताच युद्धपातळीवर तयारी सुरू केली पाहिजे.

सर्वप्रथम प्रत्येक जिल्ह्यातील पिकांची वस्तुस्थिती तातडीने नोंदवावी. दुबार पेरणीची वेळ आल्यास मोफत किंवा अनुदानित बियाणे आणि खते त्वरित उपलब्ध करून द्यावीत. पीककर्जाचे तात्पुरते पुनर्गठन करावे, कर्जवसुलीला स्थगिती द्यावी आणि पीक विमा दाव्यांची प्रक्रिया सुलभ करावी. ज्या भागात पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण होत आहे, तेथे टँकर, चारा आणि जनावरांसाठीही नियोजन आवश्यक आहे.

संकटाच्या काळात केवळ बैठका, दौरे आणि घोषणांनी प्रश्न सुटत नाहीत. प्रशासनाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन वास्तव पाहिले पाहिजे. कागदोपत्री अहवालांपेक्षा शेतातील करपणारे पीक अधिक बोलके असते. शेतकऱ्याला दिलासा देणारे निर्णय उशिरा घेतले, तर त्यांचा उपयोग उरणार नाही.

मराठवाड्याने दुष्काळाची झळ अनेकदा सोसली आहे. त्यामुळे या प्रदेशातील संकटाकडे केवळ हंगामी समस्या म्हणून पाहणे धोकादायक ठरेल. शेती वाचली तरच ग्रामीण अर्थव्यवस्था टिकेल; अन्यथा त्याचा परिणाम बाजारपेठ, रोजगार आणि संपूर्ण प्रदेशाच्या अर्थचक्रावर होईल. सरकारने आता वेळ न दवडता ठोस कृती करावी. मराठवाड्याला सहानुभूतीची नव्हे, तर तातडीच्या मदतीची गरज आहे. पाऊस आपल्या हातात नाही; पण संकटात शेतकऱ्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हे सरकारच्या हातात नक्कीच आहे. निर्णय आज घेतले, तर उद्याचा शेतकरी वाचेल. अन्यथा करपणाऱ्या पिकांसोबत त्याच्या आशाही करपतील.

# एसआयआर : मतदानाच्या अधिकाराला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न

**कोल्हापूर – मतदानाचा दिवस उजाडतो. उत्साहाने एक नागरिक मतदान केंद्रावर पोहोचतो. रांगेत उभा राहतो. त्याची वेळ येते. मात्र मतदार यादी तपासल्यानंतर त्याला सांगितले जाते आपले नाव यादीत नाही. काही क्षणांसाठी तो स्तब्ध होतो. मतदानाचा अधिकार असतानाही तो त्या दिवशी तो वापरू शकत नाही. त्या क्षणी त्याला जाणवते की लोकशाहीतील सर्वात मोठा अधिकार केवळ मतदानाच्या दिवशी मिळत नाही; तो त्याही आधी मतदार यादीत आपल्या नावाच्या अचूक नोंदीपासून सुरू होतो.**




ही जाणीव प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावी, यासाठी भारत निवडणूक आयोग वेळोवेळी मतदार यादी अद्ययावत ठेवण्याचे काम करतो. त्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणजे विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर). ही प्रक्रिया केवळ प्रशासकीय उपक्रम नाही; ती प्रत्येक पात्र नागरिकाच्या घटनात्मक मतदानाच्या अधिकाराला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न आहे.

मतदार यादी म्हणजे लोकशाहीचा पाया

घराचा मजबूत पाया दिसत नाही, पण संपूर्ण घर त्यावर उभे असते. मतदार यादीचेही तसेच आहे. मतदान केंद्रावरील मतपेटी, निवडणुकीची प्रक्रिया किंवा निकाल यापूर्वी एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची असते–मतदार यादीची अचूकता.

मतदार यादी ही केवळ नावांची यादी नसते. ती देशातील प्रत्येक पात्र नागरिकाच्या समान अधिकाराची अधिकृत नोंद असते. या यादीत नाव अचूक असणे म्हणजे मतदानाचा अधिकार सुरक्षित असणे. नाव, पत्ता किंवा इतर माहिती योग्य असल्यामुळे भविष्यातील मतदानाच्या दिवशी कोणताही अडथळा निर्माण होत नाही. त्यामुळे मतदार यादीतील प्रत्येक नोंद ही लोकशाहीवरील विश्वास अधिक दृढ करणारी ठरते.

एसआयआर का आवश्यक आहे.?

दरवर्षी नियमित पुनरीक्षणाची प्रक्रिया होत असते. त्यामध्ये नवीन मतदारांची नोंद, माहितीतील बदल किंवा दुरुस्ती केली जाते. मात्र काही वेळा अधिक व्यापक आणि सखोल पडताळणीची आवश्यकता निर्माण होते. अशा वेळी एसआयआर राबविण्यात येते.

या विशेष पुनरीक्षणाचा उद्देश प्रत्येक पात्र मतदाराची नोंद शक्य तितकी अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह ठेवणे हा असतो. कालांतराने स्थलांतर, पत्त्यातील बदल, नव्याने पात्र झालेले मतदार किंवा इतर कारणांमुळे माहितीमध्ये बदल होऊ शकतात. एसआयआर या सर्व बाबींकडे अधिक बारकाईने पाहते. त्यामुळे मतदार यादी अधिक सक्षम, पारदर्शक आणि वास्तवाशी सुसंगत बनते.

ही प्रक्रिया भविष्यातील निवडणुकांमध्ये प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग अधिक सहज आणि निर्विघ्न व्हावा, यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

घरभेट देणारा अधिकारी विश्वास जपणारा दुवा

या प्रक्रियेदरम्यान बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) किंवा निवडणूक कर्मचारी नागरिकांच्या भेटी घेतात. अनेकदा ही भेट केवळ कागदपत्रांची पडताळणी वाटू शकते. पण प्रत्यक्षात ती त्यापेक्षा कितीतरी मोठी असते.

घराच्या दाराशी आलेला बीएलओ हा केवळ माहिती नोंदवणारा अधिकारी नसतो; तो प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुरक्षित राहावा, यासाठी काम करणारा महत्त्वाचा दुवा असतो. त्याच्या नोंदींमुळे मतदार यादी अधिक अचूक बनते आणि भविष्यात मतदानाच्या दिवशी कोणालाही अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी आवश्यक तयारी पूर्ण होते.

ही प्रक्रिया नागरिक आणि निवडणूक व्यवस्थापन यांच्यातील विश्वास अधिक दृढ करते. कारण लोकशाही मजबूत होण्यासाठी प्रशासन आणि नागरिक यांचा परस्पर संवाद तितकाच आवश्यक असतो.

ही प्रक्रिया प्रशासनासाठी नव्हे प्रत्येक मतदारासाठी आहे..

लोकशाहीमध्ये प्रत्येक मत समान मूल्य घेऊन येते. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा आवाज त्यातून व्यक्त होतो. त्यामुळे मतदार यादीतील स्वतःची माहिती अचूक राहणे म्हणजे आपल्या त्या आवाजाची खात्री करून घेणे होय.

एसआयआर ही कोणत्याही एका विभागासाठी किंवा कार्यालयीन कामकाजासाठी राबवली जाणारी प्रक्रिया नाही. तिचा सर्वाधिक लाभ नागरिकालाच मिळतो. कारण योग्य आणि अद्ययावत मतदार यादी म्हणजे भविष्यात मतदानाच्या दिवशी आत्मविश्वासाने मतदान करता येण्याची खात्री.

या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे केवळ एक औपचारिकता पूर्ण करणे नव्हे; तर स्वतःच्या घटनात्मक अधिकाराचे जतन करण्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवणे होय. लोकशाहीतील आपली उपस्थिती नोंदविण्याची ही एक महत्त्वाची संधी आहे.

उद्याच्या मतदानाचा विश्वास आजच्या सहभागातून

लोकशाही ही केवळ निवडणुकीच्या दिवशी जिवंत होत नाही. ती प्रत्येक वेळी बळकट होते, जेव्हा प्रत्येक पात्र नागरिकाचा अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक प्रक्रिया मनापासून पूर्ण केली जाते.

एसआयआर ही अशीच एक विश्वास निर्माण करणारी प्रक्रिया आहे. आज काही मिनिटे देऊन केलेली माहितीची पडताळणी उद्या मतदानाच्या दिवशी निश्चितपणे मतदान करण्याचा आत्मविश्वास देते. त्यामुळे ही प्रक्रिया केवळ नोंदी अद्ययावत करण्यापुरती मर्यादित राहत नाही; ती नागरिक आणि लोकशाही यांच्यातील विश्वास अधिक दृढ करणारा पूल बनते.

प्रत्येक मत महत्त्वाचे असते, कारण त्यामागे एका नागरिकाची ओळख, त्याचा अधिकार आणि देशाच्या लोकशाहीवरील विश्वास दडलेला असतो. म्हणूनच एसआयआर ही कोणासाठी तरी नसून आपल्या प्रत्येकासाठी आहे. या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे आपल्या मतदानाच्या अधिकाराला अधिक सुरक्षित, सक्षम आणि भविष्यासाठी निश्चित करण्याचा सकारात्मक निर्णय. आणि म्हणूनच, ही प्रक्रिया माझ्यासाठी आहे आणि त्यात सहभागी होणे हे माझ्या लोकशाही प्रवासाचे स्वाभाविक पाऊल आहे.


महाराष्ट्रात भारत निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत एसआयआर अंतर्गत घरभेटींद्वारे गणना प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या काळात बूथ लेव्हल अधिकारी प्रत्येक घराला भेट देऊन गणना फॉर्म उपलब्ध करून देतात, आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी करतात आणि मतदार यादीतील नोंदी अद्ययावत करण्यासाठी माहिती संकलित करतात. त्यानंतर प्राप्त माहितीची छाननी, दावे व हरकतींची प्रक्रिया पूर्ण करून ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार अचूक, सुरक्षित आणि निर्विघ्न राहावा, हा आहे.

**सचिन अडसूळ,**
**जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर**

# शेतकऱ्यांना नापिकी आणि कर्जाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना २०२६

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**राज्यातील शेतकऱ्यांना निसर्गाच्या लहरीपणाचा सामना करत शेती करावी लागते. अतिवृष्टी, दुष्काळ, अवकाळी पाऊस अशा नैसर्गिक संकटांमुळे अनेकदा पिकांचे मोठे नुकसान होते. परिणामी अपेक्षित उत्पन्न मिळत नाही आणि शेतीसाठी घेतलेले पीककर्ज वेळेवर फेडणे कठीण होते. त्यामुळे शेतकरी नापिकी आणि कर्जबाजारीपणाच्या दुष्टचक्रात अडकतो.**




ही परिस्थिती लक्षात घेऊन राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना २०२६' जाहीर केली आहे. शासनाच्या माहितीनुसार, या योजनेचा लाभ राज्यातील ५८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना मिळणार असून, ही राज्यातील सर्वात मोठ्या कर्जमुक्ती योजनांपैकी एक मानली जात आहे.

या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे पीककर्ज माफ करण्यात येणार आहे. ज्यांचे कर्ज २ लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांनी अतिरिक्त थकीत रक्कम भरल्यानंतर त्यांनाही योजनेचा लाभ मिळू शकणार आहे. तसेच नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याची तरतूदही करण्यात आली आहे. शासनाच्या शेतकरी-केंद्रित धोरणाचा हा महत्त्वाचा भाग मानला जात आहे. पीककर्जासोबतच शेतकऱ्यांना पीकविमा घेण्यास प्रोत्साहन दिले जाते. प्रधानमंत्री फसल विमा योजना अंतर्गत नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना वेळोवेळी विमा भरपाईही मिळत आहे. बीड जिल्ह्याची अर्थव्यवस्था मुख्यत्वे शेती व शेतीपूरक व्यवसायांवर आधारित आहे. त्यामुळे या कर्जमाफी योजनेचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यापूर्वीही शासनाने नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी विविध स्वरूपात आर्थिक मदत केली आहे. २०२५-२६ च्या खरीप हंगामात अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर शेतीपिकांचे नुकसान झाले होते. त्यासाठी शासनाने १,४५८ कोटी रुपयांहून अधिक आर्थिक मदत मंजूर केली. त्यानंतर रब्बी हंगामातील पेरणीसाठी ६५० कोटी रुपयांचे अनुदान देण्यात आले. याशिवाय पीकविमा भरपाईही स्वतंत्रपणे वितरित करण्यात आली. आता या सर्व उपाययोजनांसोबतच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना २०२६ अंतर्गत २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्यात येत आहे. शेतकरी हा राज्याच्या विकासाचा केंद्रबिंदू मानून शासन विविध योजनांद्वारे त्याला आर्थिक बळ देण्याचा प्रयत्न करत आहे. नैसर्गिक आपत्ती, नापिकी आणि कर्जबाजारीपणाच्या दुष्टचक्रातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचा संदेश या योजनांमधून देण्यात आला आहे

# मिरज शासकीय रुग्णालयातील हिमोडायलिसिस सेवा ठरतेय हजारो रुग्णांसाठी जीवनदायी आधार

### चार वर्षांत १३,०७७ रुग्णांवर उपचार; एचआयव्ही बाधितांसाठी स्वतंत्र डायलिसिस यंत्राची सुविधा

**सांगली । प्रतिनिधी**

**मिरज येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील हिमोडायलिसिस सेवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ग्रामीण तसेच सीमाभागातील मूत्रपिंड विकारग्रस्त रुग्णांसाठी मोठा आधार ठरत आहे. गेल्या चार वर्षांत तब्बल १३,०७७ रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला असून, त्यामध्ये ७३९ एचआयव्ही बाधित रुग्णांचाही समावेश आहे. विशेष म्हणजे, एचआयव्ही बाधित रुग्णांसाठी स्वतंत्र डायलिसिस यंत्राची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.**



शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रकाश गुरव यांनी सांगितले की, जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या चार डायलिसिस मशीनपैकी एक मशीन एचआयव्ही बाधित रुग्णांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. सध्या रुग्णालयात एकूण सहा डायलिसिस यंत्रांद्वारे नियमित सेवा दिली जात असून, तज्ज्ञ नेफ्रॉलॉजिस्ट, प्रशिक्षित फिजिशियन आणि डायलिसिस तंत्रज्ञांच्या देखरेखीखाली उपचार होत असल्याने रुग्णांना सुरक्षित व दर्जेदार आरोग्यसेवा मिळत आहे. खाजगी रुग्णालयांमध्ये एका डायलिसिससाठी हजारो रुपयांचा खर्च येत असताना, मिरज शासकीय रुग्णालयात ही सेवा केवळ २३० रुपयांत उपलब्ध आहे. तसेच पिवळे रेशनकार्डधारक, स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ नागरिक आणि विविध शासकीय आरोग्य योजनांतील पात्र लाभार्थ्यांना ही सेवा पूर्णपणे मोफत दिली जाते. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ. रुपेशकुमार शिंदे यांनी सांगितले की, पालकमंत्री चंद्रकांत पाटील आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या संयुक्त संकल्पनेतून लवकरच मिरज शासकीय रुग्णालयात अत्याधुनिक व सुसज्ज डायलिसिस उपचार केंद्र उभारण्यात येणार आहे. या केंद्रामुळे रुग्णांना अधिक सक्षम, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण उपचार सुविधा उपलब्ध होणार आहेत. मिरजसह जत, आटपाडी, सांगोला, कोल्हापूर, सांगली तसेच कर्नाटक सीमाभागातील मोठ्या संख्येने रुग्ण या केंद्रात उपचारासाठी येतात. ग्रामीण आणि दुर्गम भागातील रुग्णांसाठी हे रुग्णालय जीवनदायी ठरत असून, वेळेत उपचार मिळाल्यामुळे अनेकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल होत आहे.

# विविध विभागांच्या समन्वयातून कर्जमुक्तीची प्रभावी अंमलबजावणी

**कोल्हापूर – राज्याच्या अर्थव्यवस्थेचा पाया असलेल्या कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम असणे अत्यावश्यक आहे. मात्र, अवकाळी पाऊस, दुष्काळ, अतिवृष्टी, बाजारभावातील चढ-उतार, वाढता उत्पादन खर्च आणि कर्जबाजारीपणा यांसारख्या संकटांमुळे अनेक शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा देतानाच त्यांना पुन्हा आर्थिक प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' राबविण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.**




ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नसून शेतकऱ्यांचा आर्थिक आत्मविश्वास पुनर्स्थापित करून त्यांना नव्याने कर्जपात्र बनविण्याचा दूरदृष्टीचा प्रयत्न आहे. राज्याच्या इतिहासातील सर्वांत मोठ्या कर्जमुक्ती उपक्रमांपैकी एक असलेल्या या योजनेद्वारे सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सहकार विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, बँका, महाआयटी, महसूल यंत्रणा, ग्रामपंचायती आणि स्थानिक प्रशासन यांच्यात प्रभावी समन्वय प्रस्थापित करण्यात आला आहे. या योजनेत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदतीच्या पीक कर्जांचा समावेश करण्यात आला आहे. थकीत, पुनर्गठित तसेच फेरपुनर्गठित पीक कर्जांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठी एकवेळ समजोता (जपश ढळाश डशीींश्रशाशपीं - जढड) योजना लागू करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी दोन लाख रुपयांवरील रक्कम भरल्यानंतर शासन त्यांच्या कर्जखात्यात दोन लाख रुपयांपर्यंतची मदत जमा करणार असून उर्वरित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.योजनेची विश्वासार्हता आणि पारदर्शकता वाढविण्यासाठी आधुनिक डिजिटल प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. या योजनेतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे आधार प्रमाणीकरण. पात्र शेतकऱ्यांची ओळख अचूकपणे निश्चित होऊन लाभ योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचावा, यासाठी आधार क्रमांक बँक खात्याशी जोडणे आवश्यक आहे. त्यामुळे सहकार विभाग आणि बँकांच्या माध्यमातून विशेष आधार-जोडणी अभियान राबविण्यात येत असून शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कर्जमुक्तीचा लाभ मिळाल्यानंतर पात्र शेतकरी पुन्हा कर्जपात्र होणार असल्याने आगामी खरीप हंगामासाठी आवश्यक भांडवल वेळेत उपलब्ध होईल. याचा थेट परिणाम शेती उत्पादनवाढ, उत्पन्नवाढ आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या गतिमानतेवर होणार आहे. कर्जमुक्तीमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक पुनर्बांधणीला चालना मिळून कृषी क्षेत्राला नवी ऊर्जा प्राप्त होईल. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत आणि स्पर्धात्मक शेती विकसित करण्यासाठीही विविध धोरणात्मक उपाययोजना राबविल्या जात आहेत. पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि बँक खात्याची माहिती अद्ययावत ठेवून शासनाच्या सूचनांचे पालन केल्यास या योजनेचा लाभ वेळेत मिळू शकतो. विविध विभागांचा समन्वय, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि पारदर्शक कार्यपद्धती यांच्या बळावर राबविण्यात येत असलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही राज्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक पुनरुत्थानाचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असून शेतीला अधिक सक्षम, शाश्वत आणि समृद्ध करण्यासाठी ही योजना निश्चितच मैलाचा दगड ठरेल.

**वृषाली पाटील,**
**सहायक संचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोल्हापूर.**

## पान १ वरून....

### भेसळीने महाराष्ट्र पुन्हा हादरला..!

येथून १,३८५ किलो रसायने व भेसळीचे साहित्य जप्त करण्यात आले. तर जय श्रीराम डेअरी फार्म येथून २,७६७ किलो सिंथेटिक दूध जप्त करून ते शेतात नष्ट करण्यात आले. राज्यातील पुणे, अहिल्यानगर, सोलापूर, ठाणे, छत्रपती संभाजीनगर आणि जळगाव या जिल्ह्यांपर्यंत या रॅकेटचे जाळे पसरल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. अन्न सुरक्षा अधिकारी स्वाती म्हस्के यांच्या तक्रारीवरून मंचर पोलीस ठाण्यात २६ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) आणि अन्न सुरक्षा व मानके अधिनियमांतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

--------

### वारीत प्रथमच एअर

यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तथा आयुक्त संजय काटकर यांच्यासह पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, महानगरपालिका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक आणि तालुका आरोग्य अधिकारी दृकश्राव्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. मंत्री आबिटकर म्हणाले की, दरवर्षी लाखो वारकरी पालखी सोहळ्यात सहभागी होत असल्याने कोणतीही आपत्कालीन वैद्यकीय परिस्थिती उद्भवल्यास तातडीने उपचार मिळणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी पालखी मार्गावर अत्याधुनिक रुग्णवाहिका, बाईक म्बुलन्स, वैद्यकीय पथके आणि तात्पुरती आरोग्य केंद्रे कार्यरत राहतील. यंदा प्रथमच एअर म्बुलन्सची सुविधा उपलब्ध करून गंभीर रुग्णांना अल्पावधीत उच्चस्तरीय रुग्णालयात दाखल करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. राज्य शासनाने वारकरी भाविकांना सुरक्षित, तत्पर आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या असून, पालखी मार्गावरील आरोग्य व्यवस्थेचे काटेकोर नियोजन करण्यात आले आहे.

-----------

### वडवणीच्या विकासकामांना गती द्या;

तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. यामध्ये जलसंधारणाची कामे, नाला व शेततळे खोलीकरण, रेशीम शेतीला प्रोत्साहन, 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजना, घरकुल योजना, आरोग्य उपकेंद्रांची सुविधा तसेच रोजगारनिर्मितीच्या योजनांचा आढावा घेण्यात आला. सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करून मंजूर विकासकामे निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावीत. नागरिकांना योजनांचा थेट लाभ मिळेल यासाठी प्रशासनाने अधिक प्रभावीपणे कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी दिले. या आढावा बैठकीस प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, जिल्हा नियोजन अधिकारी शिला मिसाळ, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किशोर काळे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी राधाकिसन इघारे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

--------------

### समाजकल्याण विभागाच्या

पत्र्याचे स्टॉल उपलब्ध करून देण्याची योजना तसेच कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत जमीन खरेदी-विक्रीसाठी सहाय्य अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी समाजकल्याण विभागाशी संपर्क साधून आवश्यक माहिती मिळवावी व वेळेत अर्ज करावेत, असेही प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे यांनी आवाहन केले आहे.

------

### संभाव्य पूरस्थितीला सामोरे जाण्यासाठी जिल्हा

पूर्वतयारीची सविस्तर माहिती सादर केली. बैठकीत जिल्हा प्रशासनाकडून पूरस्थिती उद्भवल्यास तातडीने प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री, निवारा केंद्रे, आपत्कालीन सेवा आणि समन्वय यंत्रणा पूर्णपणे सज्ज ठेवण्यात आल्याचेही सांगण्यात आले. या आढावा बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, पोलीस अधीक्षक निलोत्पल, अधीक्षक अभियंता तुषार बुरुड, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता पाटोळे, संबंधित विभागांचे कार्यकारी अभियंते तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

----------

### सर्वांगीण विकासासाठी दर्जेदार कामांना

दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन करत होते. बैठकीस केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, खासदार स्मिता वाघ, आमदार नंदकिशोर महाजन, अनिल पाटील, किशोर पाटील, सुरेश भोळे, प्रा. चंद्रकांत सोनवणे, चंद्रकांत पाटील, मंगेश चव्हाण, अमोल जावळे आणि अमोल पाटील हे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले. तर जिल्हा नियोजन समिती सभागृहात जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर, महानगरपालिका आयुक्त आदित्य जिवणे, पोलीस अधीक्षक श्रीकांत धीवरे, यावल प्रादेशिक वनविभागाचे उपवनसंरक्षक सौरभ सहाय, जळगाव प्रादेशिक वनविभागाचे उपवनसंरक्षक राम धोत्रे, जिल्हा नियोजन अधिकारी भरत साळुंखे तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि कार्यान्वयीन यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते. बैठकीत जिल्हा वार्षिक योजनेतील विविध विकासकामांचा आढावा घेण्यात आला. विकासकामांची गुणवत्ता, वेळेत अंमलबजावणी आणि निधीचा प्रभावी वापर यावर विशेष भर देत आगामी विकास आराखड्याबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.

----------

### ठेवी विनाविलंब परत द्या, प्रक्रियेला


घेतला. बैठकीला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे प्रत्यक्ष उपस्थित होते. तर खासदार बजरंग सोनवणे, आमदार विजयसिंह पंडित, आमदार प्रकाश सोळंके, आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह संबंधित अधिकारी ऑनलाइन सहभागी झाले. मुख्यमंत्र्यांनी जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांचे प्रस्ताव नव्याने तयार करून त्यांचे नामांकित व्यावसायिक संस्थेमार्फत पुनर्मूल्यांकन करण्याचे निर्देश दिले. खासगी क्षेत्रातील निकषांनुसार पारदर्शक आणि अचूक मूल्यांकन झाल्यास मालमत्तेची किंमत वाढून ठेवीदारांना त्यांचे पैसे लवकर मिळण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## महाराष्ट्र शासनाचे महत्त्वपूर्ण निर्णय...




### मराठवाड्यातील पावसाच्या तुटवड्याचा प्रश्न सभागृहात

मुंबई : मराठवाड्यात समाधानकारक पाऊस नसल्याने खरीप पिकांवर संकट ओढवले असल्याचा मुद्दा विरोधकांनी उपस्थित केला. त्यावर सरकारने परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले असून जिल्हानिहाय आढावा घेतला जात आहे. आवश्यक ठिकाणी पंचनामे, मदत आणि दुबार पेरणीसाठी उपाययोजना करण्याची तयारी असल्याचे सभागृहात सांगितले.



### शेतकऱ्यांना दुबार पेरणीसाठी मदत देण्याची मागणी

मुंबई : पावसाअभावी अनेक भागांत दुबार पेरणीची वेळ आल्याचा मुद्दा विरोधकांनी मांडला. सरकारने हवामानाची स्थिती लक्षात घेऊन कृषी विभागाला सतर्क राहण्याचे निर्देश दिले असून आवश्यकतेनुसार बियाणे आणि इतर मदतीबाबत निर्णय घेतला जाईल, असे उत्तर दिले.



### अवैध वाळू उपशावर सरकारची भूमिका

मुंबई : राज्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी अधिक कठोर कारवाई करण्याची मागणी सभागृहात करण्यात आली. त्यावर महसूल विभागाने विशेष पथके कार्यरत असून जिल्हानिहाय कारवाया सुरू असल्याचे तसेच दोषींवर कठोर गुन्हे दाखल केले जात असल्याचे स्पष्ट केले.



### महिला सुरक्षेचा मुद्दा गाजला

मुंबई : राज्यातील महिला सुरक्षेबाबत विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. त्यावर सरकारने महिला हेल्पलाइन, जलद तपास, विशेष पथके आणि आरोपींवर कठोर कारवाई सुरू असल्याचे सांगितले. महिला सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असल्याची ग्वाहीही देण्यात आली.



### रस्त्यांवरील खड्ड्यांवर सरकारचे उत्तर

मुंबई : पावसामुळे राज्यातील अनेक रस्त्यांवर खड्डे पडल्याचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीच्या दुरुस्तीचे आदेश दिले असून संबंधित ठेकेदारांवरही कारवाई करण्यात येणार असल्याचे सरकारने सभागृहात सांगितले.




### शिक्षक भरतीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

मुंबई : राज्यातील रिक्त शिक्षक पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा मुद्दा विरोधकांनी उपस्थित केला. त्यावर सरकारने शिक्षक भरती प्रक्रिया टप्प्याटप्प्याने सुरू असून रिक्त पदे लवकर भरण्यात येतील, असे स्पष्ट केले. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यावर सरकारचा भर असल्याचे सांगण्यात आले.

### जलजीवन मिशनच्या कामांवर प्रश्नचिन्ह

मुंबई : जलजीवन मिशनच्या अनेक कामांमध्ये विलंब आणि निकृष्ट दर्जाच्या कामांबाबत विरोधकांनी सरकारला जाब विचारला. त्यावर संबंधित विभागाने दोषी ठेकेदारांवर कारवाई करण्यात येत असून प्रलंबित कामे निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्याचे सभागृहात सांगितले.

## जनआरोग्य योजनेतील गैरव्यवहारांवर सरकारचा 'एसआयटी'चा दणका..!

# गरीबांच्या आरोग्य निधीवर डल्ला मारणाऱ्यांना सोडणार नाही-मुख्यमंत्री

### नाशिकनंतर बीडमध्येही चौकशीची मागणी; उच्चस्तरीय तपास झाल्यास मोठे गैरव्यवहार उघड होण्याची शक्यता

**बीड । प्रतिनिधी**

**महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेतील कथित गैरव्यवहारांवर राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. या प्रकरणांची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याचा निर्णय सरकारने घेतला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोषींवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.**

नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी स्थापन करण्यात येणार आहे. आरोग्य क्षेत्रातील शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांमध्ये गैरप्रकार




करणाऱ्यांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. दरम्यान, नाशिकप्रमाणेच बीड जिल्ह्यातही जनआरोग्य योजनेच्या अंमलबजावणीबाबत विविध स्तरांवरून तक्रारी आणि गैरव्यवहाराचे आरोप होत आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यातही स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. चौकशी झाल्यास आरोग्य योजनेतील निधीचा वापर, रुग्णालयांकडून करण्यात आलेले दावे, मंजूर करण्यात आलेली बिले आणि संबंधित यंत्रणांची भूमिका याबाबतचे सत्य समोर येण्याची शक्यता आहे. विधिमंडळात झालेल्या जनआरोग्य योजनांच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार डॉ. राहुल आहेर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जनआरोग्य योजनांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख), डेटा ॲनालिटिक्स, सायबर तपास आणि फॉरेन्सिक ऑडिटचा वापर वाढविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. तसेच प्रत्येक जिल्ह्यात फसवणूक प्रतिबंधक यंत्रणा उभारण्याची घोषणाही त्यांनी केली. गरीब आणि गरजू नागरिकांना दर्जेदार व पारदर्शक आरोग्य सेवा मिळणे ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. जनआरोग्य योजनांमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार सहन केला जाणार नाही, असे मुख्यमंत्री म्हणाले.

#### नाशिकनंतर बीडचा क्रमांक...?

नाशिक जिल्ह्यातील कथित गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने एसआयटी स्थापन केली आहे. त्याच धर्तीवर बीड जिल्ह्यातही जनआरोग्य योजनेतील संभाव्य गैरप्रकारांची चौकशी करण्याची मागणी होत आहे. बीडमधील आरोपांची अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नसली तरी, स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी झाल्यास योजनेतील अनियमितता, जबाबदार व्यक्ती आणि निधीच्या वापराबाबतची वस्तुस्थिती समोर येऊ शकते, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. गरीब रुग्णांसाठी असलेल्या निधीचा गैरवापर झाला असल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

# बीएलओंच्या उत्कृष्ट कार्याचा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते सन्मान

### विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमातील काम मुदतीपूर्वीच १०० टक्के पूर्ण



**बीड । प्रतिनिधी**

**भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचा (बीएलओ) बीडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते अभिनंदन प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन विशेष गौरव करण्यात आला. या प्रसंगी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मनोज घोडे पाटील यांची उपस्थिती होती.**

भारत निवडणूक आयोगाच्या १४ मे २०२६ च्या पत्रानुसार महाराष्ट्र राज्यात ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बीएलओमार्फत घरोघरी भेटी देऊन गणना अर्जांचे वितरण आणि संकलन करण्याचा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम राबविला जात आहे. या पार्श्वभूमीवर, बीड जिल्ह्यातील मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी आपल्या नियुक्त यादी भागातील सर्व मतदारांना प्रत्यक्ष गणना अर्जांचे वितरण करून ते स्वीकारले. तसेच, आयोगाच्या 'एउखछएढ' संगणक प्रणालीमध्ये बीएलओ ॲपद्वारे सर्व गणना अर्जांचे डिजिटल वितरण व स्वीकृतीची १०० टक्के प्रक्रिया अत्यंत जबाबदारीने आणि कार्यक्षमतेने पूर्ण केली. विशेष म्हणजे दि.२९ जुलै २०२६ पर्यंत चालणाऱ्या या मोहिमेचे संपूर्ण कामकाज या अधिकाऱ्यांनी नियोजित मुदतीपूर्वीच म्हणजेच दि.१० जुलै २०२६रोजी यशस्वीरित्या पूर्ण केले. बीएलओंच्या या तत्परता, प्रामाणिकपणा आणि उत्कृष्ट कार्यक्षमतेमुळे निवडणूक प्रक्रियेला गती मिळाली असून त्यांच्या या उल्लेखनीय योगदानाबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचे कौतुक केले. तसेच भविष्यातही याच समर्पित भावनेने काम करण्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

#### सन्मानित करण्यात आलेले बीएलओ

१) श्री. मधुकर विश्वानाथ वाघ सहशिक्षक, प्राथमिक शाळा, बंदेवाडीता. केज, जि. बीड. (यादी भाग क्र. ८०, बंदेवाडी, २३२-केज विधानसभा मतदारसंघ), २)श्री. रामेश्वर भिमराव सुंबे, सहशिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा, लोखंडवाडी ता. आष्टी, जि. बीड. (यादी भाग क्र. ८८, लोखंडवाडी, २३१-आष्टी विधानसभा मतदारसंघ), ३)श्री. रामेश्वर भिमराव सुंबे, सहशिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा, लोखंडवाडी ता. आष्टी, जि. बीड. ( यादी भाग क्र. ८८, लोखंडवाडी, २३१-आष्टी विधानसभामतदारसंघ) बीड जिल्ह्यातील सध्या अस्तित्वात असलेल्या मतदार यादीतील सर्व मतदारांनी या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत आपले गणना अर्ज भरून घ्यावेत. नव्याने अद्ययावत होणाऱ्या मतदार यादीतील नोंदींच्या पडताळणीसाठी आपल्या भागातील बीएलओकडून अर्ज प्राप्त करून ते योग्यरित्या भरून द्यावेत, जेणेकरून हा कार्यक्रम विहित कालावधीत यशस्वी होईल, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.




### पर्यावरण जनजागृतीसाठी तुलसी कॉलेजची रॅली

बीड । प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित वन महोत्सव सप्ताह अंतर्गत सोमवार दि. ६ जुलै रोजी शहरात पर्यावरण जनजागृती रॅली काढण्यात आली.

झाडे लावा, झाडे जगवा, पर्यावरण वाचवा, देश वाचवा अशा विविध घोषणा देत विद्यार्थिनींनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.या रॅलीचे नियोजन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.श्वेता वंजारे यांनी केले. रॅलीच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे तसेच सर्व प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आषाढी वारीतील चरणसेवा उपक्रम उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वी

बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तथा सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी वारीनिमित्त आयोजित करण्यात आलेला चरणसेवा उपक्रम बुधवार, दि. ८ जुलै २०२६ रोजी चिंतेश्वर मंदिर, गेवराई जि.बीड व टीपीएस कॉलनी परळी जिल्हा बीड येथे उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीपणे संपन्न झाला.

मुक्ताईनगर येथून आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या संत मुक्ताबाई पालखी दिंडीची परंपरा अनेक वर्षांपासून अखंड सुरू आहे सोबतच गजानन महाराज पालखी दिंडी शेगाव ही बीड जिल्ह्यात परळी या ठिकाणी मुक्कामस येते . या दिंडीसोबत महाराष्ट्रातील शेकडो वारकरी पायी वारी करून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे जातात. वारकऱ्यांच्या पायी प्रवासामुळे होणारा शारीरिक थकवा कमी करणे, त्यांच्या पायांची व स्नायूंची योग्य काळजी घेणे तसेच आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, या उद्देशाने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयराजे पंडित यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मंत्रालय, मुंबईचे विशेष कार्य अधिकारी तथा कक्ष प्रमुख श्री रामेश्वर नाईक, डॉ. स्वानंद सोनार तसेच जिल्हाधिकारी विवेक जॉनसन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि जिल्हा आरोग्य आधिकारी डॉ उल्हास गंडाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाचे नियोजन करण्यात आले.

या उपक्रमात सुमारे ७० स्वयंसेवकच्या चमूने ४०० हून अधिक वारकऱ्यांना चरणसेवा व आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी यांनी आरोग्य तपासणी व आवश्यक औषधोपचार उपलब्ध करून दिले. तसेच फिजिओथेरपी, आयुष उपचार पद्धतीद्वारे सेवा आणि पंचकर्म उपचारही देण्यात आले. या सेवेमुळे पायी प्रवासामुळे आलेला शारीरिक थकवा दूर होऊन पुढील वारीसाठी नवचैतन्य आणि ऊर्जा मिळाल्याची भावना अनेक वारकऱ्यांनी व्यक्त केली. दिंडीतील वारकऱ्यांनीही उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून आयोजकांचे आभार मानले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी गुरु माऊली आयुर्वेदिक महाविध्यलाय माळीपरगाव तालुका माजलगाव , आर बी अट्टल महाविद्यालय,गेवराई , जय भवानी महाविद्यालय गढी येथील छडड विध्यार्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा परिषद बीड, यांचे मोलाचे सहकार्य लाभले. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेडचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चैतन्य कागदे, समन्वयक गणेश गिराम, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कदम , डॉ पिंगळे, गेवराई तालुका आरोग्य अधिकारी डॉ गोंदीकर अभय ,परळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ मोरे , अशोक लोखंडे यांनी उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. वारकऱ्यांच्या आरोग्यसेवेला प्राधान्य देणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे प्रभावी उदाहरण ठरला असून भविष्यातही अशा स्वरूपाचे उपक्रम अधिक व्यापक स्तरावर राबविण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.



# शाळा सुरु होण्यापूर्वीच शिक्षकांच्या बदल्या पूर्ण होणार

### विद्यार्थ्यांना वर्षभर मिळणार पूर्णवेळ शिक्षक

**मुंबई । प्रतिनिधी**

**शाळा सुरू झाल्यानंतर शिक्षकांच्या बदल्या आणि समायोजनामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी टाळण्यासाठी आता नवीन नियोजन करण्यात येणार आहे. शाळा सुरू होण्यापूर्वीच शिक्षकांची पदोन्नती, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन आणि बदली प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नवीन नियमावली तयार केली जाणार असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत दिली.**

आमदार श्रीजया चव्हाण यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री गोरे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शिक्षकांसाठी टीईटी पात्रता अनिवार्य करण्यात आली आहे. तसेच काही प्रकरणे न्यायालयीन प्रक्रियेत असल्याने पदोन्नती प्रक्रियेला विलंब झाला. त्याचा परिणाम शिक्षकांचे समायोजन आणि बदली प्रक्रियेवर झाला. सध्या मुख्याध्यापक पदासाठीची पदोन्नती प्रक्रिया सुरू असून, ती पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात येणार आहे. ही प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्यासाठी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (सीईओ) सूचना देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. विद्यमान शिक्षक बदली प्रक्रिया अधिक सुलभ आणि वेळेत पूर्ण होईल, यासाठी शासनाकडून आवश्यक सुधारणा करण्यात येतील. शाळेच्या पहिल्याच दिवसापासून विद्यार्थ्यांना नियमित व पूर्णवेळ शिक्षक उपलब्ध व्हावेत, हा शासनाचा उद्देश असल्याचे मंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केले.

# ओळखीपलीकडे शिक्षणाचा हक्क..!

### तृतीयपंथीय विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना 'स्माईल'ची नवी उभारी-शेख आयेशा

**बीड । प्रतिनिधी**

**समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अनेक वर्षे वंचित राहिलेल्या तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून सन्मानाने जगण्याची संधी मिळावी, या उद्देशाने केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाने 'स्माईल (डचखडए)' शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत पात्र तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना दरवर्षी १३,५०० रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येणार असून, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे.**



या योजनेचा लाभ इयत्ता ९ वी व १० वीतील प्री-मॅट्रिक, इयत्ता ११ वी, १२ वी, महाविद्यालयीन तसेच पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना मिळणार आहे. शासनमान्य अथवा खासगी शाळा, महाविद्यालय किंवा विद्यापीठात नियमित शिक्षण घेणारे भारतीय नागरिक या योजनेसाठी पात्र असतील. मात्र, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाकडून जारी करण्यात आलेले अधिकृत ट्रान्सजेंडर आयडेंटिटी सर्टिफिकेट असणे बंधनकारक आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पोर्टलवर नोंदणी करून ऑनलाइन अर्ज करावा. शिष्यवृत्तीच्या जागा मर्यादित असल्याने लाभार्थ्यांची निवड मागील शैक्षणिक वर्षातील गुणवत्तेनुसार केली जाणार आहे. तसेच केंद्र किंवा राज्य शासनाच्या अन्य कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेणारे विद्यार्थी या योजनेसाठी पात्र राहणार नाहीत. शिष्यवृत्तीची रक्कम थेट डीबीटी (इढ) प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांच्या आधार-लिंक बँक खात्यात जमा केली जाईल. ही योजना केवळ आर्थिक मदत नसून, तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना शिक्षण, समान संधी आणि सन्मानाने भविष्य घडविण्याचा नवा विश्वास देणारे महत्त्वाचे पाऊल असल्याची भावना विविध सामाजिक संघटनांकडून व्यक्त होत आहे.

#### पत्रकार शेख आयेशा यांच्या न्याय मागणीला अखेर सरकारकडून संवेदनशील साथ..

दरम्यान, महाराष्ट्रात तृतीयपंथीय विद्यार्थ्यांसाठी अशा स्वरूपाच्या शैक्षणिक सहाय्याची गरज असल्याचे सातत्याने मांडणाऱ्या 'आश्रय सेवाभावी केंद्राच्या' अध्यक्षा तथा पत्रकार शेख आयेशा यांनी या विषयावर अनेकदा शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या सातत्यपूर्ण मागणीमुळे तृतीयपंथीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाविषयी शासनाची संवेदनशील भूमिका अधिक ठळकपणे समोर आल्याचे मानले जात आहे.

# राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक-कलाकार सन्मान योजना ज्येष्ठ कलावंतांना सन्मानाने जगण्याचा आधार

### सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत १ ते ३१ जुलै दरम्यान ऑनलाइन अर्ज प्रक्रिया; पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा ५ हजार रुपये मानधन

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक-कलाकार सन्मान योजना' अंतर्गत कला व साहित्य क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १०० ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा ५,००० रुपये मानधन प्रदान करण्यात येणार आहे. या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांनी दि. १ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत करण्यात आले आहे.**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक न्याय, समता आणि सर्वसमावेशक विकासाची दिलेली प्रेरणा जपत, आयुष्यभर कला आणि साहित्य क्षेत्रासाठी योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना आर्थिक आधार व सन्मान मिळावा, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांच्या योगदानाचा गौरव करून त्यांना सन्मानपूर्वक जीवन जगण्यास सहाय्य करणे, हा या योजनेमागील प्रमुख हेतू आहे. या योजनेसाठी अर्जदाराचे वय ५० वर्षांपेक्षा अधिक असणे आवश्यक असून दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादेत १० वर्षांची शिथिलता देण्यात आली आहे. त्यामुळे दिव्यांग अर्जदारांसाठी किमान वय ४० वर्षे निश्चित करण्यात आले आहे. अर्जदाराचे कला अथवा साहित्य क्षेत्रातील किमान १५ वर्षांचे योगदान आवश्यक असून वयाने ज्येष्ठ असलेले विधवा, परित्यक्ता आणि दिव्यांग कलाकारांना प्राधान्य देण्यात येणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा अधिक नसावे. तसेच ज्यांची उपजीविका प्रामुख्याने कलेवर अवलंबून असून अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही, अशाच पात्र कलाकारांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. केंद्र किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही नियमित मासिक पेन्शन अथवा महामंडळाच्या निवृत्तीवेतनाचा लाभ घेणारे अर्जदार या योजनेसाठी अपात्र राहतील. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे. ऑनलाइन अर्ज भरताना वयाचा दाखला, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, प्रतिज्ञापत्र, पती-पत्नीचे संयुक्त छायाचित्र (लागू असल्यास), बँक पासबुक, अपंगत्व प्रमाणपत्र (लागू असल्यास), राज्य अथवा केंद्र शासनाचे संबंधित प्रमाणपत्र (लागू असल्यास), नामांकित संस्था किंवा व्यक्तींचे शिफारसपत्र (लागू असल्यास) तसेच आवश्यक इतर कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. सदर योजना मा. ड. आशिष शेलार, मंत्री (सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास), महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून तसेच मा. डॉ. किरण कुलकर्णी, सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. राज्यातील ज्येष्ठ साहित्यिक आणि कलाकारांच्या कलासाधनेचा सन्मान करून त्यांना सामाजिक व आर्थिक बळ देण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग सातत्याने विविध कल्याणकारी उपक्रम राबवत आहे. पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांनी अर्जाची अंतिम मुदत लक्षात घेऊन दि. ३१ जुलै २०२६ पूर्वी 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम पांडे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.

cmyk

SHIV VANI
शिव वाणी
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

क्रीडा, न्यायनिवाडा, क्राईम घडामोडी...


सोमवार, दि.१३ जुलै २०२६
Monday, Dt. 13 july 2026

## क्रीडा विश्वातील ताज्या घडामोडी...





### फिफा विश्वचषक उपांत्यपूर्व फेरीत रंगत वाढली

न्यूयॉर्क : फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धा उपांत्यपूर्व फेरीत पोहोचली असून अर्जेंटिना, स्पेन, इंग्लंड आणि अन्य बलाढ्य संघांमध्ये चुरशीचे सामने सुरू आहेत. लिओनेल मेस्सीच्या नेतृत्वाखाली अर्जेंटिनाने दमदार कामगिरी कायम ठेवली असून अंतिम फेरी गाठण्यासाठी सर्व संघांचे प्रयत्न सुरू आहेत.



### इंग्लंड-नॉर्वे लढतीकडे फुटबॉलप्रेमींचे लक्ष

मियामी : विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीतील इंग्लंड आणि नॉर्वे यांच्यातील सामना या आठवड्यातील सर्वाधिक चर्चेचा ठरला. दोन्ही संघांनी विजयासाठी जोरदार तयारी केली असून या सामन्याच्या विजेत्याला उपांत्य फेरीचे तिकीट मिळणार आहे.




### मेस्सीकडून पुन्हा दमदार खेळाची अपेक्षा

कॅन्सस सिटी : अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सी याच्याकडे पुन्हा एकदा चाहत्यांच्या आशा लागल्या आहेत. विश्वचषकातील त्याच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे अर्जेंटिना विजेतपदाच्या शर्यतीतील प्रबळ दावेदार मानला जात आहे.





### विम्बल्डन अंतिम फेरीसाठी झ्वेरेव्ह पात्र

लंडन : जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्हने उपांत्य फेरीत आर्थर फेरीचा पराभव करून प्रथमच विम्बल्डनच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. प्रभावी सर्व्हिस आणि आक्रमक खेळाच्या जोरावर त्याने विजय मिळविला.



### विम्बल्डन महिला अंतिम फेरीची उत्सुकता

लंडन : विम्बल्डन २०२६ स्पर्धेची महिला एकेरी अंतिम फेरी या आठवड्यात रंगणार असून नवी विजेती मिळणार आहे. यंदाच्या स्पर्धेत अनेक अव्वल मानांकित खेळाडूंना अनपेक्षित पराभवाचा सामना करावा लागला.




### स्कॉटिश ओपन गोल्फ स्पर्धेत अव्वल खेळाडूंची चुरस

स्कॉटलंड : स्कॉटिश ओपन गोल्फ स्पर्धेत रोरी मॅकलरॉय आणि स्कॉटी शेफ्लरसह अव्वल खेळाडूंमध्ये विजेतपदासाठी चुरस रंगली आहे. या स्पर्धेला जगभरातील गोल्फप्रेमींचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

# गुन्हेगारी घटनांनी देश पुन्हा एकदा हादरला..!









### लॉरेन्स बिश्नोई टोळीविरोधात आंतरराष्ट्रीय कारवाई

नवी दिल्ली : कुख्यात गुंड लॉरेन्स बिश्नोईच्या गुन्हेगारी जाळ्यावर अमेरिकेची एफबीआय आणि इतर तपास यंत्रणांनी संयुक्त कारवाई केली. अमेरिका, कॅनडा आणि युरोपमध्ये ५० हून अधिक ठिकाणी छापे टाकून दोन डझन संशयितांना अटक करण्यात आली. मोठ्या प्रमाणात शस्त्रे, अंमली पदार्थ आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली.

### गुरुग्राममध्ये पोलिस चकमकीत चार गुंड ठार

गुरुग्राम : हरियाणातील गुरुग्राममध्ये पोलिस आणि दीपक नंदाल टोळीतील गुंडांमध्ये झालेल्या चकमकीत चार संशयित गुंड ठार झाले. दोन्ही बाजूंनी सुमारे ६० गोळ्या झाडण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. या कारवाईनंतर नंदालच्या गुन्हेगारी साम्राज्यावर मोठा आघात झाल्याचे मानले जात आहे.

### आग्रा येथे शस्त्र तस्करी रॅकेट उद्ध्वस्त

आग्रा : उत्तर प्रदेश पोलिसांनी मोठी कारवाई करत बेकायदा शस्त्र तस्करी करणारे रॅकेट उध्वस्त केले. दोन आरोपींना अटक करण्यात आली असून मोठ्या प्रमाणात देशी बनावटीची शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. या प्रकरणाचा संबंध इतर राज्यांतील गुन्हेगारी टोळ्यांशी आहे का, याचा तपास सुरू आहे.

### मुंबईत अल्पवयीन मैत्रिणीच्या हत्येप्रकरणी आरोपी अटकेत

मुंबई : कांदिवली पूर्व येथे अल्पवयीन मैत्रिणीच्या हत्येप्रकरणी एका डिलिव्हरी बॉयला गुन्हा घडल्यापासून २४ तासांच्या आत अटक करण्यात आली. पोलिसांनी तांत्रिक पुरावे आणि सीसीटीव्हीच्या आधारे आरोपीला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

### पश्चिम बंगालमध्ये टोळीविरोधी कायदा लागू

कोलकाता : राज्यातील संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पश्चिम बंगाल सरकारने नवीन टोळीविरोधी कायदा लागू करण्याची घोषणा केली. गुन्हेगारी टोळ्यांच्या मालमत्तेवर कारवाई आणि जप्त मालमत्तेचा लिलाव करण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे.

### सायबर फसवणुकीविरोधात केंद्रीय यंत्रणांचा सापळा

नवी दिल्ली : देशभरात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विविध केंद्रीय तपास यंत्रणांनी ऑनलाइन फसवणूक करणाऱ्या टोळ्यांवर कारवाई तीव्र केली आहे. डिजिटल अटक, गुंतवणूक आणि बँकिंग फसवणुकीच्या प्रकरणांचा तपास वेगाने सुरू असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### अपहरण प्रकरणी दिल्ली पोलिसांची तातडीची कारवाई

नवी दिल्ली : राजधानी दिल्लीत १७ वर्षीय मुलाचे अपहरण झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवून त्याची सुटका केली. या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली असून संबंधित गंभीर गुन्ह्यांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### बारुईपूर अल्पवयीन मुलीच्या मृत्यू प्रकरणी दुसरा आरोपी अटकेत

कोलकाता : पश्चिम बंगालमधील बारुईपूर येथे १२ वर्षीय मुलीच्या मृत्यू प्रकरणात विशेष तपास पथकाने दुसऱ्या आरोपीला अटक केली. आणखी काही संशयितांची चौकशी सुरू असून या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### फरार गुन्हेगारांविरोधात विशेष मोहीम

धनबाद : झारखंडमधील धनबाद पोलिसांनी फरार आरोपींविरोधात विशेष मोहीम राबवून अनेक संशयितांना ताब्यात घेतले. या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारीत घट झाल्याचा दावा पोलिसांनी केला असून पुढील काळातही मोहीम सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### राज्यांमध्ये संघटित गुन्हेगारीविरोधात संयुक्त कारवाई

नवी दिल्ली : विविध राज्यांतील पोलिस आणि केंद्रीय तपास यंत्रणांनी संघटित गुन्हेगारी, शस्त्र तस्करी, अमली पदार्थ आणि खंडणी प्रकरणांवर संयुक्त कारवाया वाढवल्या आहेत. आंतरराज्य टोळ्यांचे आर्थिक जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी विशेष तपास सुरू असून अनेक संशयितांवर नजर ठेवण्यात आली आहे.

### चेन्नईतील निर्घृण हत्याप्रकरणी तिघांना अटक

चेन्नई : व्यासरपाडी परिसरात २० वर्षीय तरुणाची धारदार शस्त्रांनी हत्या केल्याप्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. जुन्या गटवैरातून हा खून झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष असून दोन आरोपी अद्याप फरार आहेत. त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

### उत्तर प्रदेशात बेहिशेबी संपत्तीचा मोठा पर्दाफाश

लखनौ : माजी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याच्या घरावर टाकलेल्या छाप्यात तपास यंत्रणांनी १३ किलो सोने आणि १.६२ कोटी रुपयांची रोकड जप्त केली. घरातील भिंती, छत आणि फर्निचरमध्ये संपत्ती लपवून ठेवण्यात आल्याचे तपासात समोर आले असून पुढील चौकशी सुरू आहे.

### पित्यानेच मुलाच्या हत्येचा कट रचल्याचा आरोप

मदुराई : दोन वर्षांपूर्वी घडलेल्या तरुणाच्या निर्घृण हत्येचा तपास पूर्ण करत पोलिसांनी मृताच्या वडिलांसह एका साथीदाराला अटक केली. पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेहाचे तुकडे करून नदीत फेकल्याचा आरोप असून या प्रकरणामुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे.

### दिल्लीत अवैध शस्त्रांसह सराईत गुन्हेगार जेरबंद

नवी दिल्ली : दिल्ली पोलिसांनी विशेष मोहिमेदरम्यान एका सराईत गुन्हेगाराला अटक केली. त्याच्याकडून बेकायदा चाकू आणि चोरीचे अनेक मोबाईल जप्त करण्यात आले. त्याच्यावर यापूर्वीही विविध गुन्हे दाखल असून त्याच्या इतर साथीदारांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### सोशल मीडियावर फोटो व्हायरल करून खंडणी; गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर : विवाहानंतर विवाहित महिलेचे जुने फोटो सोशल मीडियावर व्हायरल करून कुटुंबाला धमकावल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पीडित कुटुंबाकडून तक्रार मिळाल्यानंतर तपास सुरू करण्यात आला असून संबंधित आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. सायबर गुन्ह्यांबाबत नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## अवैध वाळू वाहतुकीवर गेवराई पोलिसांचा घाला; पिकअपसह ९.०६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**गेवराई । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीविरोधात पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून, गेवराई पोलिसांनी मध्यरात्री धडक कारवाई करत अवैध वाळूची वाहतूक करणारा पिकअप वाहनासह तब्बल ९ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एका चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, या कारवाईमुळे अवैध वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत.**

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्ह्यातील अवैध धंदे, विशेषतः अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश सर्व पोलीस ठाण्यांना दिले आहेत. त्यानुसार गेवराई पोलीस ठाण्याचे पथक शहर आणि परिसरात नियमित गस्त घालत असताना १० जुलै २०२६ रोजी मध्यरात्री १२.१५ वाजण्याच्या सुमारास शिवाजीनगर-कोल्हेर रोड परिसरात एक पांढऱ्या रंगाचा अशोक लेलँड कंपनीचा 'बडा दोस्त' पिकअप संशयास्पदरीत्या फिरताना आढळून आला. पोलिसांनी वाहन अडवून त्याची तपासणी केली असता, वाहनामध्ये कोणत्याही प्रकारचा वैध परवाना अथवा शासकीय परवानगी नसताना अवैधरित्या वाळूची वाहतूक केली जात असल्याचे निष्पन्न झाले.

# ऊसाच्या शेतात गांजाची शेती

## चकलांबा पोलिसांचा छापा, ४८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा पोलिसांनी अवैध अमली पदार्थांच्या निर्मूलनासाठी सुरू केलेल्या विशेष मोहिमेला मोठे यश मिळाले असून, गेवराई तालुक्यातील सुरळेगाव शिवारात ऊसाच्या शेतामध्ये लपवून करण्यात आलेली गांजाची लागवड चकलांबा पोलिसांनी उद्ध्वस्त केली आहे. या कारवाईत गांजाची २५३ झाडे, सुका व निमसुका गांजा असा एकूण ४८ लाख २७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जिल्ह्यातील अमली पदार्थाविरोधातील ही अलीकडच्या काळातील महत्त्वाची कारवाई मानली जात आहे.**

पोलिसांना गोपनीय माहिती मिळाल्यानंतर चकलांबा पोलीस ठाण्याच्या पथकाने तातडीने सुरळेगाव शिवारातील गट क्रमांक



११३ मध्ये छापा टाकला. ऊसाच्या दाट पिकामध्ये अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने गांजाची लागवड करण्यात आल्याचे तपासादरम्यान समोर आले. पोलिसांनी संपूर्ण परिसराची पाहणी करून पंचनामा केला आणि गांजाची झाडे जप्त करून लागवड नष्ट केली. कारवाईदरम्यान पोलिसांना गांजाची लहान-मोठी २५३ झाडे आढळून आली. या झाडांचे एकूण वजन १८४.४ किलो असून त्यांची अंदाजित किंमत ४६ लाख १० हजार रुपये इतकी आहे. याशिवाय घटनास्थळावरून ४ किलो ३०० ग्रॅम सुका गांजा (किंमत २ लाख ६ हजार ४०० रुपये) तसेच ४५० ग्रॅम निमसुका गांजा (किंमत ११ हजार २५० रुपये) जप्त करण्यात आला. अशा प्रकारे एकूण ४८ लाख २७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. या प्रकरणी मनोज ऊर्फ बादल भगवान आंधळे (वय ३६, रा. नगद नारायण वस्ती, सुरळेगाव, ता. गेवराई) याच्याविरुद्ध अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये (एनडीपीएस कायदा) गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, या अवैध व्यवसायामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, गांजाची विक्री कुठे केली जाणार होती, तसेच या प्रकरणाशी संबंधित इतर व्यक्तींचा शोध घेण्याच्या दृष्टीने पोलिसांनी तपास सुरू केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, पोलीस उपनिरीक्षक गणेश कन्हाडकर, सहाय्यक फौजदार सोमनाथ कुलकर्णी, पोलीस हवालदार विश्वनाथ प्रधान, नरेंद्र बांगर तसेच पोलीस अंमलदार हनुमान इंगोले, संदीप गायकवाड आणि प्रशांत घोंगडे यांनी सहभाग घेतला. बीड जिल्हा पोलीस दलाने अमली पदार्थांची लागवड, साठवणूक, विक्री व वाहतूक याविरोधात विशेष मोहीम सुरू केली असून, त्याअंतर्गत सातत्याने धडक कारवाया केल्या जात आहेत. या कारवाईमुळे अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींमध्ये मोठी खळबळ उडाली असून, अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.


### नागरिकांना आवाहन

अमली पदार्थांची लागवड, साठवणूक, विक्री किंवा वाहतूक याबाबत कोणतीही माहिती असल्यास नागरिकांनी तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी किंवा अंमली पदार्थविरोधी पथकाच्या ९२७०२४३२०० या क्रमांकावर संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव व ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, असे आवाहन बीड पोलिसांनी केले आहे.

# वेगवान खटल्यांवर सर्वोच्च न्यायालयाचे महाराष्ट्र सरकारला खडेबोल

**नवी दिल्ली : अटक केलेल्या आरोपींचे खटले वर्षानुवर्षे प्रलंबित राहण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त केली. जामिनाला विरोध करण्यापेक्षा वेळेत खटले चालविणे ही राज्याची जबाबदारी असल्याचे स्पष्ट करत, विलंब कायम राहिल्यास राज्याची निष्क्रियता उघड करू, असा इशाराही न्यायालयाने दिला.**








### रिफ्यूज एरियावरील अतिक्रमण हटविण्याचा आदेश कायम

मुंबई : दादर येथील इमारतीच्या रिफ्यूज एरियावरील अतिक्रमण हटविण्याच्या महापालिकेच्या आदेशाला मुंबई उच्च न्यायालयाने दुजोरा दिला. निवृत्त आयपीएस अधिकाऱ्याची याचिका फेटाळून लावत, रिफ्यूज एरिया हा आपत्कालीन वापरासाठी असून त्यावर खासगी ताबा ठेवता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

### लुकआऊट सर्क्युलर मागे; याचिका निकाली

मुंबई : अभिनेता कमाल आर. खान (केआरके) यांच्याविरोधातील लुकआऊट सर्क्युलर राज्य सरकारने मागे घेतल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने त्यांची याचिका निकाली काढली. सरकारने निर्बंध मागे घेतल्यामुळे पुढील सुनावणीची आवश्यकता नसल्याचे न्यायालयाने नमूद केले.

### 'जलभरावाला नागरिकही तितकेच जबाबदार'

मुंबई : मुंबईतील पावसाळी जलभरावाच्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. नाले तुंबवणे, अतिक्रमणे आणि नियमांचे उल्लंघन यामुळेच समस्या वाढते. प्रत्येक वेळी फक्त महापालिकेलाच दोष देणे योग्य नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

### 'लोकशाहीत न्यायपालिकेचे महत्त्व कमी लेखू नका'

नागपूर : एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने न्यायपालिकेची भूमिका कमी लेखण्याबाबत चिंता व्यक्त केली. विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका हे लोकशाहीचे समान महत्त्वाचे स्तंभ असून घटनात्मक संतुलन राखणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

### निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी रोखणे अयोग्य

मुंबई : बेस्टच्या निवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित ग्रॅच्युइटी व पेन्शन प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने प्रशासनाला फटकारले. आर्थिक अडचणीचे कारण देऊन कर्मचाऱ्यांचे कायदेशीर हक्क रोखता येणार नाहीत. निवृत्तीनंतर देय रक्कम वेळेत अदा करणे बंधनकारक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

### रेल्वे अपघातातील भरपाईबाबत सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

नवी दिल्ली : रेल्वे अपघातातील मृत्यू आणि गंभीर जखमी प्रवाशांच्या भरपाईच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत, पात्र लाभार्थ्यांना विनाकारण विलंब लावू नये, असे स्पष्ट केले. भरपाईच्या दाव्यांवर तातडीने निर्णय घेण्याचे निर्देश देत न्यायालयाने पीडितांच्या हक्कांचे संरक्षण करणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे नमूद केले.

### पर्यावरण संरक्षणाबाबत उच्च न्यायालयाची कठोर भूमिका

मुंबई : पर्यावरणाच्या ऱ्हासास कारणीभूत ठरणाऱ्या अनधिकृत बांधकामे आणि प्रदूषणाच्या प्रकरणांवर मुंबई उच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतली. पर्यावरणविषयक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश देत, नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करता येणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

### महिलांच्या सुरक्षेच्या प्रकरणात जलद तपासाचे निर्देश

नवी दिल्ली : महिलांवरील अत्याचाराच्या एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने तपास यंत्रणांना जलदगतीने तपास पूर्ण करण्याचे निर्देश दिले. अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये अनावश्यक विलंब टाळून पीडितेला वेळेत न्याय मिळणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले. महिला सुरक्षा ही केवळ सरकारी जबाबदारी नसून समाजाचीही सामूहिक जबाबदारी असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले.

### सरकारी जमिनीवरील अतिक्रमण हटविण्यास न्यायालयाचा हिरवा कंदील

मुंबई : सरकारी जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईला आव्हान देणारी याचिका फेटाळून लावत मुंबई उच्च न्यायालयाने प्रशासनाच्या कारवाईला मान्यता दिली. सार्वजनिक मालमत्तेवर कोणालाही बेकायदेशीर ताबा ठेवण्याचा अधिकार नसल्याचे स्पष्ट करत, नियमानुसार अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू ठेवण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी अंकिता ऑफसेट प्रिंटींग, प्लॉट नं.डी-३ एम.आय.डी.सी.बीड-४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : क्रांती नगर, तळेकर निवास जवळ, डॉ.बारकुल हॉस्पिटलजवळ, बीड येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत)

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ANKITA OFFSET PRINTING, POLOT NO.D-3, MIDC BEED-431122 AND PUBLISHED AT. THE OFFICE OF W E E K LY SHIVVANI, BEED OFFICE : KRANTI NAGAR, NEAR TALEKAR NIWAS, NEAR DR.BARKUL HOSPITAL, BEED. (JURISDICTION AT BEED)

cmyk